पाक्षिक | शेतकरी संघटक | वर्ष ११ वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | | अंक ३ रा
किंमत १ रुपया २५ पैसे | | २१ मे १९९४

# सूर्य दिसला नाही तरी चालेल; गुंडांची नजर नको

— शरद जोशी

### जनान्याचे पुनरागमन

एका नव्या हिंदी बोलपटाचा 'प्रिमिअर शो' मुंबईत एका चित्रपटगृहात मोठ्या थाटामाटाने दाखवला गेला. असे पहिले खेळ सारखे होतच असतात. या खेळाचे वैशिष्ट्य असे की सारा कार्यक्रम फक्त महिला प्रेक्षकांकरिता राखीव होता. मुंबईच्या पहिल्या महिला मेयर कार्यक्रमास खास उपस्थित होत्या. असा महिलांसाठी वेगळा खेळ होणे एकूण महिला चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचीच नव्हे तर स्पृहणीय घटना आहे, असे वक्त्यांनी आणि प्रमुख पाहुण्यांनी आवर्जून सांगितले.

मुंबईच्या बेस्ट बसेसमध्ये महिलांकरिता राखीव जागा अलिकडे अलिकडे ठेवल्या गेल्या आहेत. मुंबईतील लोकलगाडीत बायकांचा वेगळा डबा फार पहिल्यापासून आहे, पण आता खास बायकांसाठीच अशा खास गाड्या सोडल्या जातात. काही बँकांनी खास महिलांकरिता म्हणून शाखा उघडल्या आहेत. नगर जिल्ह्यात केवळ स्त्री सभासदांचा एक साखर कारखाना केंद्र शासनाने मंजूर केल्याची बातमी याच आठवड्यात वाचायला मिळाली. चित्रपटगृहे, नाट्यगृहे अशा सार्वजनिक ठिकाणी बायकांची बसण्याची सोय वेगळी करण्याची मागणी ठिकठिकाणी होत असते.

सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांकरिता व्यवस्था वेगळी असावी किंवा नसावी हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाही; ज्याच्या त्याच्या सोयी आणि समजुतीचा हा भाग आहे. अशी वेगळी व्यवस्था होणे हे स्त्रियांच्या प्रगतीचे आणि स्त्री चळवळीच्या बळकटीचे लक्षण आहे असा जो युक्तिवाद केला जातो त्यामुळे काहीसा गोंधळ उडतो आहे.

### असूर्यपश्या, असूर्य दृष्टा

खानदानी, गरत्या बायकांनी घरीच रहावे; सूर्याने त्यांना पाहू नये आणि त्यांनी सूर्याला पाहू नये, असा एक मोठा कालखंड होऊन गेला, काळ होताच तसा. कोणी बाईमाणूस बरी दिसते म्हणून कोणा अंमलदाराला किंवा सत्ताधिशाला कळले तर काही खैर नाही; आपला संसार धड चालायचा असेल तर त्याचा आस्वाद चार भिंतींच्या आतच घेणे शक्य आहे अशी सर्व स्त्रीपुरुषांची भावना होती. जेव्हा सर्वत्र गुंडांचे राज्य होते तेव्हा स्त्रिया घरातील जनानखान्यातच कोंडल्या जाव्यात हे साहजिकच होते.

राजे रजवाडे गेले, इंग्रज आले गेले; 'काँग्रेस' आले तरी खेडेगावांतील परिस्थिती जवळपास अशीच राहिली; निर्धास्त कधी झालीच नाही. धनदांडग्यांच्या धाकाने शेतकरी बाई घरात कोंडलेलीच राहिली. शेतावरची कामे करण्यासाठी सूर्याचे दर्शन करणे भागच होते, एरव्ही बाहेर पडायचे ते फक्त कीर्तनाला. तेथेही स्त्रियांची बसण्याची व्यवस्था वेगळी. स्त्रिया आणि पुरुष एकत्र येऊन बोलतील, गातील, आनंद साजरा करतील ही शक्यता फक्त पंढरपूरच्या वारीत, गळ्यात तुळशीची माळ घातल्यानंतर मिळायची.

### ईश्वराचे अतर्क्य वरदान

इंग्रजी अंमल आला, ठगीचा बंदोबस्त झाला, कायद्याचा अंमल चालू झाला, पाठीवरील काठीला सोने बांधून काशीयात्रेला जावे अशी परिस्थिती झाली तेव्हां स्त्रियांना पडदानशीन ठेवण्याची गरज निदान शहरी भद्र समाजात राहिली नाही. इंग्रजी शिक्षण आणि संस्कृती यांच्याशी संबंध आलेला वर्ग निर्धास्त बनला आणि त्यांची बायकामंडळी घराबाहेर पडू लागली. इंग्रजी अंमलातील शांतता आणि सुव्यवस्था यांचा लाभ मिळालेल्या घरात कैद करणारी 'जनाना व्यवस्था' झपाट्याने संपत गेली तरी शतकांनंतर घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीला सार्वजनिक जागी मोठे अवघड वाटे. त्यामुळे दुकानात, सभांमध्ये, करमणुकीच्या जागी, बसगाड्यांत, आगगाड्यांत 'जनाना' व्यवस्था ठेवण्यात येत असे. स्त्रीमुक्तीच्या उदयकालांत जनाना व्यवस्थेचा प्रसार झाला. पुढे दुसऱ्या महायुद्धात नोकऱ्यांकरिता स्त्रिया बाहेर पडल्या आणि जनाना व्यवस्थेचे महत्त्व संपत गेले. आगगाड्यांमध्ये बायकांचा डबा चालूच राहिला पण अगदी एकट्याने प्रवास करणाऱ्या स्त्रियासुद्धा बिनधास्तपणे पुरुषांच्या डब्यातून प्रवास करणे पसंत करू लागल्या.

आदर्श राज्याचे वर्णन कालीदासाने केले आहे. "हा राजा राज्य करीत असतांना वारुणिपानाने रस्त्यावरच झोपी गेलेल्या स्त्रियांच्या अंगावरील वस्त्रे वारादेखील हलवीत नसे, चोरीसाठी कोणाचा हात धजेल?" स्त्रीपुरुष समानतेची एवढी उडी

झेपणे आजही कठीण आहे; पण स्त्रीपुरुषांनी निरोगी मनाने निर्धास्तपणे मिश्र समाजात मिसळावे हे सुसंस्कृत समाजाचे लक्षण मानले पाहिजे. 'जनाना व्यवस्थेचे' विसर्जन हे स्त्रियांच्या प्रगतीचे आणि वाढत्या समानतेचे लक्षण होते यांत वाद नाही. घरातला जनानखाना मोडणे, नंतर सार्वजनिक जागेतील जनाना व्यवस्था मोडणे ह्याही स्त्रियांच्या चळवळीच्या यशाच्या पायऱ्या धरल्या तर गेले अर्धे शतक स्त्रियांच्या मुक्तीचे झाले.

## स्त्रीमुक्तीचा 'घूम जाव'

मग आता स्त्री-चळवळ उलट्या दिशेने चालू लागली की काय? बायकांचा 'जनाना शो' करणे, बायकांकरिता वेगळी बँकेची शाखा उघडणे, बायकांकरिता वेगळा साखर कारखाना इत्यादि संस्था काढणे हे अचानक स्त्री चळवळीचे कार्यक्रम कसे बनले? 'घराबाहेर' पडायला निघालेली स्त्री स्वातंत्र्याच्या वाऱ्याचा थोडा अनुभव येण्याआधीच आपणहून आपल्या शिंपल्यात मागे जाऊ का पहात आहे? महिला चळवळीने ही उलटी दिशा का घेतली? स्वातंत्र्याच्या ऐवजी सुरक्षिततेची हमी महिला चळवळ का शोधू लागली?

## गुंडशाहीचे पुनरुत्थान

या प्रश्नावर विद्वत्तापूर्ण चर्चा आणि विवेचन करणे निरर्थक आहे. कोणाही बाईमाणसाला प्रश्न विचारा, बसमध्ये बसताना बायकांसाठी राखीव जागांवर बसणे तुम्ही का पसंत करता? सगळ्या स्त्रियांचा एकसारखा अनुभव आहे. शेजारी बसणाऱ्या पुरुषांच्या आंबटशौकी चाळ्यांची त्यांना घृणा आहे. शेजारी बसणारा पुरुष बारा वर्षाचे पोर असो की साठी उलटलेला पिकल्या केसांचा आजोबा असो, कोणी पहात नाही याची खात्री असेल तर किमान हाताचे चाळे केल्याखेरीज राहत नाही. गाडीत गर्दीत शरीराला शरीर खेटून उभे राहण्याची वेळ आली तर त्याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्नही न करणारा पुरुष विरळा. खुलेपणाने समाजात वावरून आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा ही इच्छा तर आहे पण त्याबरोबर आंबटशौकीन आणि उघड उघड सुऱ्या पिस्तुलांचा धाक दाखवत फिरणारे गुंडपुंड यांच्यापासून संरक्षण कसे करून घ्यावे हे नव्या स्त्रीपुढचे मोठे प्रश्नचिन्ह आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशाचा भावी राष्ट्राध्यक्ष क्लिंटन गवर्नरपदी सेक्रेटरीवर हात टाकल्याखेरीज राहू शकत नाही. रस्त्यावर हत्यारे परजीत बलात्कारी खुलेआम फिरत आहेत. या परिस्थितीत 'स्वातंत्र्यलक्ष्यी' स्त्रियांची चळवळ 'संरक्षणलक्ष्यी' बनत आहे. जनान्याचे पुनरागमन हे या 'संरक्षणलक्ष्यी' प्रवृत्तीचे चिन्ह आहे.

इंग्रजांनी हिंदुस्थानात आणलेला कायद्याचा आणि सुव्यवस्थेचा अंमल संपला आहे. ठगांचे आणि गुंडांचे राज्य चालू आहे. सरकारी कार्यालयात हे गुंड लेखणीने आणि कागदाने कापतात. सरकारी निर्बंधांमुळे गुंडगिरी आणि तस्करी फोफावली आहे. दादांचा अंमल इतका जबर की पाहिजे तेथे, पाहिजे तेव्हा, पाहिजे त्याला, अगदी भर कोर्टात, भर दिवसा, भर वाहतुकीत, जरूर तर राहत्या घरात घुसूनसुद्धा खलास करू शकतात. त्यांच्याविरुद्ध पोलिसांकडेही दाद मागायला जायची सोय नाही. पोलिसांना पगारापेक्षा दादांकडून मिळणाऱ्या हप्त्याची रक्कम किती तरी अधिक! कालीदासाचा आदर्श सोडा, पोलीस चौकीत तक्रारीसाठी गेलेल्या स्त्रियांवर तेथील अधिकाच बलात्कार करण्याचा धोका फार मोठा! नेतेमंडळीही सगळी दादांनी पोसलेली; त्यांच्याच बैठकीतली, दिवसातून चार वेळा त्यांना टेलिफोन करणारी. तक्रार घेऊन जाण्यासाठी म्हणून कोठे जागा राहिलेली नाही. थोडक्यात, इंग्रज गेल्यानंतर ५० वर्षात हिंदुस्थान ५०० वर्षे मागे गेला आहे.

## इतिहासाची पुनरावृत्ती

स्त्रियांचे स्वातंत्र्य हे निर्धास्त खुल्या वातावरणात फुलणारे फूल आहे. पुंडांच्या सरंजामशाहीत ते फुलले नाही; इंग्रजी आमदानीत थोडा काळ ते फुलू लागले, त्याचा सुगंध दरवळेल अशी आशा निर्माण होते न होते तोच पुंडांचे राज्य पुन्हा उतरले. फुलणारी कळी पुन्हा एकदा 'जनाना' व्यवस्थेच्या कोशात परत जात आहे.

सिनेमाचा 'जनाना शो' हा महिला चळवळीचा कार्यक्रम नाही, महिला चळवळीच्या पराभवाचे ते लक्षण आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सर्व राजवटींची आणि नेहरूव्यवस्थेच्या पराभवांचे प्रमाणपत्र आहे.

स्त्री-चळवळीच्या पुच्छगतीचा एक उपयोग झाला. समाजात कुटुंबव्यवस्थेत पुरुषप्रधानता का आली? स्त्रियांना दुय्यम स्थान का मिळाले या विषयावर वेगवेगळी मते आहेत. आज येथे जे घडते आहे त्यावरून जवळजवळ ३०० वर्षापूर्वी कोणत्या कारणाने स्त्रियांवर दास्यत्व लादले गेले असेल आणि कोणत्या परिस्थितीत ते त्यांनी स्वीकारले असेल याचा चांगला अंदाज येतो.

पोटापाण्यासाठी पक्षीजनावरांप्रमाणे सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत वणवण भटकणाऱ्या जंगली माणसांच्या टोळ्यांत स्त्रियांकडे प्राधान्य नसले तरी वरीयता होती. माणूस शेतीतून 'वरकड उत्पन्न' काढू लागला आणि शेतीसमाजांत मात्र पुरुषप्रधान व्यवस्था तयार झाली. हा इतिहास सर्वमान्य आहे. पण हे असे का झाले याबद्दल वादविवाद आहेत. शेतीवरील खळ्यात धान्याच्या राशी पडू लागल्यापासून लुटारूंचा आणि गुंडपुंडांचा कालखंड चालू झाला. सगळ्या जगभर लूट, जाळपोळ, रक्तपात, बलात्कार यांचा इतिहास घडला. लढाईत कोणीही जिंको कोणीही हारो सगळ्यात प्रचंड हार होते ती दोन्ही बाजूंच्या स्त्रियांची. तलवारी चमकू लागल्या, तोफा गडगडू लागल्या की स्त्रियांना 'जनाना व्यवस्था' मान्य करावी लागते. हे ३००० वर्षापूर्वी घडले आज पुन्हा प्रत्यक्ष आपल्या डोळ्यासमोर त्याची पुनरावृत्ती होते आहे. ● ● ●

## कूरियर संपर्क

श्री. शरद जोशी यांच्या नावे काही महत्त्वाचे टपाल आपण कूरियर सर्व्हिसने पुढील पत्त्यावर पाठवू शकता.

**Shri. Sharad Joshi,**
C/o Airfreight Ltd.
Atur House,
Dr. Ambedkar Road, Pune 411 001.
Phone : 0212-647374/75/76/77

श्री. शरद जोशी यांचा
STD Phone No. : 02135–52354
Fax No. : 02135–52354

## शेतकऱ्यांचे कैवारी

# विठ्ठल रामजी शिंदे

**– अरविंद वामन कुलकर्णी, पुणे.**

विठ्ठल रामजी शिंदे (२३/४/१८७३ ते २/४/१९४४) हे महाराष्ट्रातील एक लोकोत्तर म्हणावे असे व्यक्तिमत्व होय. अर्थार्जनाचे बहुविध मार्ग उपलब्ध असूनही प्रार्थनासमाजासारख्या (आडमार्गी) धार्मिक चळवळीला वाहून घेतलेल्या या (पदवीधर) व्यक्तीने स्वभावागत व्यापक औदार्याच्या जोरावरच त्या चळवळीच्या सीमा ओलांडल्या आणि स्वतःला साऱ्या समाजाच्या विकास कार्यासाठी समर्पित केले. त्यांनी अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले. काँग्रेसचे राजकारण केले. शिक्षण प्रसारासाठी लोकमन तयार करण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. उपेक्षित अशा बळिराज्याच्या म्हणजे शेतकऱ्याच्या सुस्थितीसाठी अविश्रांत श्रम घेतले. त्यांचा विशेष हा की हे सारे करताना त्यानी कधीही, दूरान्वयानेसुद्धा, त्या ब्राह्मणेतर चळवळ जोरात असलेल्या काळातही आणि स्वतः बहुजन समाजाचे असूनही जातीपातीचा आधार घेतला नाही.

१९२० सालच्या मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीत मराठ्यांसाठी सात जागा राखीव ठेवलेल्या असूनही त्यावर त्यानी आपली उमेदवारी जाहीर केली नाही. 'उलट त्या राखीव जागेसाठी मी उभा राहणार नाही. त्यातील जातीयवाचक तत्त्वाच्या मी विरुद्ध आहे' असे बजावून शिंदे ही निवडणूक अतिसामान्यांच्या 'बहुजन पक्षा'तर्फे लढले आणि पराभूत झाले. त्यांचा हा पराभवच आपण आज श्रेष्ठ विजय मानू.

शिक्षण किंवा संपत्ती नसलेल्या आणि जमखंडीसारख्या कानडी संस्थानी आडगावी जन्मलेल्या विठ्ठल रामजीनी अतिशय डोळसपणे केलेले 'देशाटन, पंडितमैत्री, सभेत संचार' आणि यांच्याबरोबरच अन्तःप्रेरणा व व्यासंग या विशेषांच्या जोरावर आत्मविकास साधला, अनेक सामाजिक क्षेत्रांत महनीय कार्य केले.

प्रकृतीने ते संतकुळात शोभावे असे होते. त्यांच्या शांत, संयमी आणि विचारशील व्यक्तिमत्वाला एक खंबीर असा कृतिशीलतेचाही महत्त्वाचा पदर होता. 'जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले' या संतोक्तीत बसेल असेच हे व्यक्तिमत्व होय. त्यामुळेच ज्योतिबा फुल्यांनंतरचा महाराष्ट्रातील महापुरुष किंवा 'महात्म्या' नंतरचा 'महर्षी' असे बिरुद त्याना लाभले.

महात्मा फुले किंवा कृष्णराव भालेकर यांच्यानंतर शेतकऱ्यांच्या पातळीवरून (दुष्काळ वगैरेंचे निमित्त साधून नव्हे तर सातत्याने) गंभीरपणे शेतकऱ्याची कैफियत मांडली ती महर्षी शिंदे यांनीच! देशाचे भ्रमण करताना त्यांच्याकरवी केल्या गेलेल्या अवलोकनाबरोबरच त्या काळातील दोन गोष्टींचे या संदर्भात स्मरण ठेवायला हवे. पहिली गोष्ट अशी की १९२० नंतर म. गांधींची भारतातील राजकारणावर वादातीत पकड आली. कराची काँग्रेस आणि चंपारण्य या दोन्ही घटना या आधीच घडून गेल्या होत्या आणि म. गांधींनी स्वातंत्र्यलढ्यात भारताचा ग्रामीण भाग व तेथील शेतीवर जगणारी जनता यांना प्रतिष्ठापूर्वक समाविष्ट करून घेतलेले होते. त्यामुळे बेताबेताने का होईना, भारताच्या नकाशात शेतकरी अधोरेखित होऊ लागलेला होता. दुसरी, याला जोडूनच येणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे गुजराथेतील बार्डोली येथे 'सरदार' वल्लभभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली १९२६-२७ साली शेतकऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली साराबंदीची चळवळ! आठवणी आणि अनुभव मध्येही याचा आणि शेतकऱ्यांत संचारू लागलेल्या आत्मविश्वासाचा विठ्ठल रामजीनी उल्लेख केलेला आहे.

'शिंदे लेखसंग्रह' या डॉ. मा. पं. मंगुडकर यांनी संपादित केलेल्या ग्रंथात शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दलचे एकूण सहा लेख आहेत. ती वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या परिषदांसमोर दिलेली भाषणे आहेत. वास्तवातील शेतकऱ्यांची परिस्थिती एकच असल्यामुळे त्यात एकाच समान भूमिकेचा पुनरुच्चार झालेला आहे. प्रसंगपरत्वे काही वेगळे विचारही त्यात मांडले गेलेले आहेत. मुळात भाषणे म्हणूनच त्यांचे लेखन झालेले असल्यामुळे वक्तृत्वाचे काही विशेष त्यात उतरलेले आहेत. आवाहनपरता मोठ्या प्रमाणावर आहे. पण शेतकऱ्याच्या दुःस्थितीचे फक्त भावनात्मक अंगाने केलेले वर्णन असे त्यांचे स्वरूप नाही. तिथे भर आहे तो बौद्धिक विश्लेषणावरच!

त्यानी दिलेली ही सर्व भाषणे १९२६ ते १९३२ दरम्यानची आहेत. त्यामुळे त्यांना जागतिक मंदीचा संदर्भ प्राप्त झालेला आहे. तेरदाळ (जि. सांगली) येथील एका भाषणात त्यानी या संदर्भाची शेतकरी नजरेसमोर ठेवून चांगली जाण व्यक्त केली आहे. ते म्हणतात, 'अखिल जगालाच गेल्या १-२ वर्षात एक भयंकर क्षयरोग झालेला आहे. तो म्हणजे आजकालचे शेतात निपजणाऱ्या मालाचे झपाट्याने खाली घसरणारे बाजारभाव.' यापेक्षा यानंतर विठ्ठल रामजी जे सांगतात ते जास्त चांगल्या तऱ्हेने त्यांच्या वस्तुस्थितीच्या नेमक्या ज्ञानाची उकल करते. त्यानी पुढे असे म्हटले आहे की, 'पण ही मंदी व्यापाऱ्यांना, राज्यकारभाऱ्यांना, पगारी नोकरांना किंबहुना मजुरांना जितकी भोवते, त्याहून अनेक पटीने जास्त असहाय्य व असंघटित शेतकऱ्यालाच भोवते. ह्याचे एकच कारण हे की वरील सर्व वर्गांच्या हाती नाणी खेळत असतात.'

हा सर्व स्वातंत्र्यपूर्व काळ होता. स्वातंत्र्यलढ्याला चांगली गती प्राप्त होती. या काळात समाजजीवनातील प्रत्येक अपायकारी

**उठ ग्यानबा, धर गचांडी**
**कर लादून म्हणे**
**देतात सबसिडी**

गोष्ट भारताच्या राजकीय पारतंत्र्याशी जोडण्याचा रिवाजच झालेला होता. तशात विठ्ठल रामजी हे नुसते काँग्रेसमध्येच नव्हते, तर १९३० च्या असहकाराच्या आंदोलनातील सहभागाबद्दल सहा महिने सश्रम कारावासाची सजा भोगलेले सत्याग्रहीही होते. पण अनेक ठिकाणी त्यानी ठामपणे सांगितले आहे की शेतकऱ्यांचा प्रश्न हा पूर्णपणे आर्थिक स्वरूपाचा प्रश्न आहे. म्हणजे राजकीय नव्हे. पुण्याला भरलेल्या अस्पृश्यांच्या शेतकी परिषदेत त्यानी अस्पृश्यता हा सामाजिक प्रश्न असून शेतीचा प्रश्न आर्थिक असल्याचे आवर्जून सांगितले आहे.

वडनेर येथील चांदवड तालुका शेतकरी परिषदेत बोलताना ते म्हणाले आहेत की सरकार, सावकार आणि नोकरशाही शेतकऱ्यांना विरोधच करील. काँग्रेस जोवर म. गांधी व नेहरू यांच्या मुठीत आहे तोवर ती शेतकऱ्यांच्या बाजूस राहील. पण ती श्रीमंतांची व सुशिक्षितांची आहे. शेतकरी वर्ग नेमका याच्या उलट आहे. म्हणजे श्रीमंत नाही व सुशिक्षितही नाही. शिवाय काँग्रेसचे कार्य राजकारणाचे आणि शेतकऱ्यांचे कार्य अर्थकारणाचे किंवा सामाजिक स्वरूपाचे म्हणून त्यांचा आग्रह आहे की 'शेतकऱ्यांची चळवळ ह्यापुढे बाहेरच्या कोणत्याही कारणावर अवलंबून चालणार नाही.' भावी पार्लमेंट असलेल्या काँग्रेसमध्ये शेतकऱ्यांनी दबाव गट (किंवा प्रेशर लॉबी) बनले पाहिजे असे सूचित करून ते म्हणतात, 'शेतकऱ्यांनो, तुम्ही राजकारण हा आपला दुय्यम उद्देश ठेवा, आणि तुमची स्वतःची आर्थिक व सामाजिक उर्फ विधायक (सं) घटना तयार करणे हाच मुख्य उद्देश ठेवा.'

शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची तेरदाळच्या शेतकरी परिषदेत त्यानी थोडक्यात केलेली मीमांसा लक्षणीय आहे. ते म्हणतात, 'साधारपणे पाहताना जगात कोठेही गेले तरी शेतकरी म्हणजे प्रत्यक्ष शेतात पोटासाठी रात्रंदिन खपणारा रयत, हा अनादिकालापासून कंगालच दिसून येत आहे. ह्याची उघड कारणे म्हणजे त्याचा साधेपणा, भोळेपणा व अडाणीपणा हीच होत. ह्या व्यक्तिगत कारणात संघटनेचा अभाव ह्या सामुदायिक कारणाची अलिकडच्या सुधारलेल्या उर्फ यांत्रिक युगात भर पडल्यामुळे शेतकरी हा एक कायमचा गुलामांचा वर्ग बनलेला आहे. पिढ्यान्‌पिढ्या तो सावलीत राहणाऱ्या भांडवलवाल्याकडे कसा गहाण पडला आहे हे स्पष्ट असूनही, भांडवलवाल्याला मात्र ते कबूल नाही; आणि स्वतःही शेतकऱ्यालाही स्वतःची गुलामगिरी जाणवत नाही, हे मोठे दुर्भाग्य! अशा या पिढीजाद दुर्गतीमुळे शेतकऱ्यांची दानतही बिघडत चालली आहे. त्यांच्यातला रामराज्यातला साधेपणा व सरळपणा टिकणे अशक्य होत आहे आणि मग त्यांची पावले वाकडी पडू लागल्यामुळे ती अधिक खोलातच शिरतात, आणि त्यांच्या मानगुटीवर अढळपद धारण करून बसलेल्या भांडवलशाहीला तर हीच स्थिती पाहिजे असते. ह्यातच पुढे शेतकऱ्यांच्या व्यसनांची, कायदेकोर्टातल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अन्यायांची, वकिलांच्या कपटनीतीची वगैरे अनेक कारणांची भर पडून शेतकरी हल्ली सुधारलेल्या नरकयातना भोगीत आहे ह्यात काय आश्चर्य?'

बळिराजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतकऱ्याचे शोषण प्राचीन काळापासून चालत आलेले आहे याची महर्षी शिंद्यांना जाणीव आहे. बोरगाव येथील वाळवे तालुका शेतकरी परिषदेत बोलताना ते म्हणतात, 'प्राचीन राजे शेताच्या उत्पन्नाचा सहावा हिस्सा घेत; पण ते स्वतःही शेतकरी असत. त्यावेळी शेती फार धोक्याची असे. म्हणून त्यांच्या संरक्षणाची आतापेक्षा जास्त गरज असे.' (हे वाचताना रामदासांच्या 'अस्मानी-सुलतानी' प्रकरणातील 'पिके होताचि होताचि । सुरू होते लुटालुटी' या ओळी आठवून जातात.) ही भूतकाली स्थिती झाली. वर्तमानकाळात शिंद्यांना काय दिसते? तर 'आता धोका फार कमी, पण शेतकऱ्यांवर साऱ्याच्या रूपानेच नव्हे तर इतर अनेक दृश्य व अदृश्य रूपाने कराचा बोजा भारी, आणि खेड्यातून आणि जंगलातून रोगराई, वनपशू इत्यादी अनेक संकटातून बचाव करण्याची जबाबदारी आपणावर जवळजवळ नाहीच असे अलिकडचे राजे वागतात.' तेव्हा, आपत्काळ नसेल तेव्हा करांचे बोजे असतातच. पण आपत्काळातही जबाबदारी न घेता शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडून दिले जाते हीच आजची वस्तुस्थिती ते स्पष्ट करतात. त्यांच्या मते 'ठरविलेला कर शेतकऱ्याने दिलाच पाहिजे. पण त्याचबरोबर इतरांप्रमाणे शेतकऱ्याच्या योगक्षेमाचीही जबाबदारी राष्ट्रावर येते. राष्ट्र वा त्याचे अधिकारी टाळाटाळ करतील तर शेतकरीही कर देण्यास टाळाटाळ करू शकतो. आपत्काळी करबंदी हा शेतकऱ्याचा ईश्वरदत्त अधिकार आहे! मात्र तो सनदशीर मार्गाने, ऐक्याने अमलात आणावा.'

योग्य तो न्याय मिळण्यासाठी शेतकऱ्यांची संघटना उभी राहिली पाहिजे असे त्यांना वाटते. शहरात गिरण्यांमध्ये कामासाठी गेलेला कामगार हा विस्थापित शेतकरी असून त्याच्या संघटनेशी शेतकऱ्यांची संघटना जोडली गेली पाहिजे. परिस्थितीच्या अनुकूलतेमुळे कामगार सहज संघटित होऊ शकतो, पण प्रतिकूलतेमुळे (उदा. खेड्यात राहणे, एकाच भांडवलदाराशी निश्चित संबंध न येणे, जमिनीशी मुलामाणसांसह बांधला गेलेला असणे इ.) शेतकरी संघटित होण्यात फार अडचणी येतात याची त्याना कल्पना आहे. शोषक वर्गाच्या हितसंबंधी गटाकडून तर कसा कावेबाज अडथळा निर्माण केला जाईल याचा त्यानी एका ठिकाणी उल्लेख केला आहे. शेतकऱ्यांना कुणी 'स्वार्थत्यागी, बिनपोषाखाचे सुशिक्षित व करारी' नेते लाभले आणि त्यानी शेतकऱ्यांची 'चळवळ राजकारणापासून कितीही दूर ठेवली व नुसत्या अर्थशास्त्राची गुंतागुंत जगाला कशी भोवते हेही प्रांजलपणे सांगणाऱ्यांना ते उपद्‌व्यापी राजद्रोही आहेत अशी हूल राज्यकर्त्यांकडूनच

(पान ६ वर)

**पुढारी आला, बोलू लागला**
**विचारा त्याला**
**सबसिडीचे टक्के उणे सत्तर**
**गप्प का होता? द्या उत्तर**

**कर्जवसुली अधिकारी?**
**चोवीस हजार कोटींची शेतकऱ्यांची दरवर्षी लूट करणाऱ्या दरोडेखोर सरकारच हस्तक**
**— त्याच्या तोंडाला काळे फासा**

# कार्यकारिणी बैठक

## अकोला ८ मे १९९४

## वृत्तांत

शेतकरी संघटनेच्या विस्तारीत कार्यकारिणीची बैठक अकोला येथे दिनाक ८ मे १९९४ रोजी पार पडली. बैठकीला संपूर्ण महाराष्ट्रभरातून सुमारे ३०० कार्यकर्ते हजर होते. बळीराज्यांचे ठराव जास्तीत जास्त तडफेने अमलात आणणारा जिल्हा अकोला. त्या जिल्ह्याचा सन्मान म्हणून या बैठकीचे आयोजन अकोल्यात करण्यात आले होते. त्यामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी बैठकीची व्यवस्था विशेष उत्साहाने केली होती.

बैठक सुरू होण्यापूर्वी अकोला जिल्हा शेतकरी संघटनेच्या कार्यालयाचे उद्‌घाटन शरद जोशी यांच्या हस्ते झाले.

बैठकीच्या प्रास्ताविकात शरद जोशींनी बैठकीच्या आर्थिक पार्श्वभूमीचा आकडेवारीसहीत आढावा घेतला. सरकार शेतकऱ्यांना उणे ६९ टक्के सबसिडी देत असल्याचे स्वतः सरकारच कबूल करीत असले तरी शेतकऱ्यांना लुटणारी जुनीच धोरणे सरकार चालू ठेवीत आहे हे लक्षात घेता लढाई अटळ आहे असे सांगून बैठकीत निर्णयासाठी (१) लढाईचे तंत्र (२) कर्जमुक्ती (३) नोकरशाहीचा विरोध व (४) स्वातंत्र्यप्रेमी जनतेचा लढा या विषयांवर चर्चा व्हावी अशी सूचना त्यांनी प्रास्ताविकाच्या शेवटी केली.

बैठकीचा घोषित विषय 'राजकीय समितीचा राजकीय पर्याय उभा करण्याचा निर्णय' हा होता. त्या संदर्भात बोलतांना ते म्हणाले, 'शेतकरी आंदोलन हे मूलतः आर्थिक आंदोलन आहे, सुरुवातीला त्याचे पाईक गावठाणातील शेतकरी पुरुष होते. त्यानंतर गावठाणातील स्त्रियानाही त्यांत सामील करून घेण्यात आले. पुढे राजवाड्यातील स्त्रीपुरुषांना बरोबर घेतले. आता, खुल्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात हा आर्थिक लढा अधिक व्यापक झाला असून त्यात शेतकरी समाजाबरोबरच बिगरशेतकरी उद्योजक व स्वातंत्र्यप्रेमी समाजालाही सामावून घ्यावे लागेल. त्यासाठी एक राजकीय पर्याय उभा करण्याची आवश्यकता आहे. पण हा पर्याय सर्वार्थाने आगळावेगळा असायला हवा.'

शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीचे सदस्य ॲड. मोरेश्वर टेमुर्डे यांनी शेतकरी संघटनेने वेळोवेळी परिस्थितीनुसार राजकीय भूमिकेबाबत घेतलेल्या निर्णयाचा सविस्तर आढावा घेऊन स्वातंत्र्यप्रेमी उद्योजकांच्या आघाडीच्या बांधणीस उपयुक्त होतील अशा सूचना करण्याची कार्यकर्त्यांना विनंती केली.

राजकीय समितीच्या सदस्य, शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर यांनी आपल्या भाषणात म्हटले की राजकीय पर्याय उभा करण्याची आवश्यकता तर आहेच पण इतर पक्षांहून अत्यंत भिन्न अशा पर्यायालाच लोक मान्यता देतील.

चर्चेमध्ये सर्वश्री गोपाळराव परांजपे, डॉ. मानवेंद्र काचोळे, डॉ. वसंतराव बोंडे, रामचंद्रबापू पाटील, अजित नरदे, शंकर धोंडगे, अध्यक्ष पाशा पटेल, अकोला-अमरावती-बुलढाणा जिल्ह्यांच्या कापूस सीमापार आंदोलनाचे सेनापती प्रकाश पोहरे, डॉ. अशोक पातुरकर इत्यादी कार्यकर्त्यांनी भाग घेतला.

राजकीय पर्याय कोणताही उभा राहिला तरी शेतकरी संघटना ही स्वतंत्र प्रतिमेची आणि प्रतिभेची संघटना म्हणून सतत कार्यरत राहील या धारणेने

(१) अडाण्यातल्या अडाण्या 'ग्यानबा'पर्यंत उणे ६९ टक्के सबसिडीचा अन्वयार्थ पोहोचविणे,

(२) उणे ६९ टक्के सबसिडीच्या अनुषंगाने राजकीय पुढाऱ्यांना गावात प्रश्न विचारून त्यांचे बेगडी शेतकरीप्रेम उघडे पाडणे,

(३) दरसाल देशातील शेतकऱ्यांना २४,००० कोटी रुपयांना लुटणारे सरकारच शेतकऱ्यांचे प्रचंड देणे लागत आहे म्हणून थकित असलेल्या केवळ १४,००० कोटी रुपयांच्या कर्जाबाबत 'कर्जमुक्ती' आंदोलन सुरू करणे, आणि

(४) राजकीय समिती राजकीय पर्याय उभा करण्यासाठी जे प्रयत्न करीत आहे त्यांना पाठिंबा देणे

हे कार्यक्रम या बैठकीत निश्चित करण्यात आले.

# स्वातंत्र्यलढ्याची मुहूर्ताची परिषद

## संघटना पाईकांना सूचना

शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीने देशभरातील स्वातंत्र्यप्रेमी कार्यकर्ते व विचारवंत यांची एक परिषद मुंबई चौपाटी भागातील भारतीय विद्याभवन येथे दिनांक २८ मे १९९४ रोजी आयोजित केली आहे. या बैठकीस निमंत्रित कार्यकर्ते व विचारवंतांनी उद्योजक शेतकरी व उद्योजक कारखानदार यांना सरकारी जाचापासून मुक्त वातावरणात आपल्या उद्यमशीलतेचा आविष्कार करण्यासाठी आधार देणारा राजकीय पर्याय असण्याची आवश्यकता व तो तसा उभा राहाण्याची शक्यता यांवर विचारविनिमय करून निर्णय घ्यावा अशी राजकीय समितीची अपेक्षा आहे.

शेतकरी संघटनेच्या पाईकांना या परिषदेत कायकाय घडते याबद्दल उत्सुकता असणे साहजिकच आहे. त्यामुळे बरेच पाईक मुंबईस येण्याची शक्यता गृहीत धरून ही सूचना करीत आहोत.

बैठकीची जागा मर्यादित असून त्या प्रमाणात निमंत्रणे रवाना झालेली आहे. शेतकरी संघटनेची राजकीय समिती ही या परिषदेची निमंत्रक असल्याने निमंत्रितांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेणे ही तेथे हजर असलेल्या शेतकरी संघटना पाईकांची जबाबदारी आहे आणि ती ते संघटनेच्या नेहमीच्या शिस्तीने पार पाडतील असा विश्वास आहे.

बैठकीच्या जागेत सोय होऊ न शकलेल्या पाईकांना व अनिमंत्रित स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांना बैठकीत काय काय चर्चा होत आहे हे पाहता, ऐकता यावे म्हणून क्लोज सर्किट टीव्हीची जोडणी करण्यात येणार आहे.

**— राजकीय समिती**

शेतकरी संघटना

नव्हे तर त्यांचे साथीदार सुखासीन भांडवलदार व नोकरशाही ह्यांच्याकडूनही उठविण्यात येते.' (ही स्वतः महर्षींचीही कैफियत असावी. यानंतर सुमारे पन्नास वर्षे गेल्यावरही केवळ आर्थिक पातळीवर शेतकऱ्यांना संघटित करू पाहणाऱ्या श्री. शरद जोशींबाबत हाच आरोप प्रारंभी सतत करण्यात आल्याचे सर्वश्रुत आहेच!)

संघटनेबरोबरच ग्रामीण भागात सक्तीचे शिक्षण सुरू झाले पाहिजे असे विठ्ठल रामजींना वाटते. १९२६ सालच्या पुण्याला झालेल्या अस्पृश्यांच्या शेतकी परिषदेत आपला हा विचार मांडताना त्यानी शेतकी कमिशनपुढे भारतीय शिक्षणमंत्र्याने दिलेल्या साक्षीचा हवाला दिला आहे. तो देतानाही त्यांच्या मनात अर्थसूत्रच जागे आहे, 'शेतकीत अधिक पैदाशी करून वाढलेल्या पैदाशीचा खप योग्य वेळी करून आपला फायदा करून घ्यावयाचा असेल तर हिंदी शेतकऱ्यांची हल्लीची मनोरचनाच बदलली पाहिजे. ती सक्तीचे शिक्षणाशिवाय होणे नाही' अशी ही साक्ष आहे.

जातीपातीचा वापर करून शेतकऱ्यांत फूट पाडली जाण्याची शक्यताही त्यानी ध्यानी घेतलेली आहे. १९३१ सालच्या 'अखिल भोर संस्थान परिषदे'त याविषयी बोलताना 'शेटे, पोतनीस, वाळिंबे हे आजचे मावळे होत. ह्यांची जात विचारू नका, प्रकृती विचारा. ती प्रकृती स्वराज्यशील आहे' असे उद्‌गार त्यानी काढले आहेत. 'ब्राह्मण अथवा सुशिक्षित वर्ग हा शहरात राहून सावलीत बसून काम करणारा, मंत्र सांगून दुसरे त्याची अंमलबजावणी करतील अशी वाट पाहणारा'

**दरसाल चोवीस हजार कोटी लुटले मग वाडवडिलांपासून साचलेले चौदा हजार कोटी कसे नाही फिटले? ग्यानबा ग्यानबा कर्जमुक्त अधिकाऱ्याच्या तोंडाला डांबर फासा फक्त**

# उणे ६९ टक्के सबसिडीचे गणित

गॅटच्या सचिवालयाला इंडिया सरकारने शेतीमालांच्या किंमतीसंबंधी दिलेल्या अहवालावरून सोबतचा तक्ता तयार केला आहे.

उणे ६९ टक्के सबसिडीचा अन्वयार्थ 'ग्यानबा'पर्यंत पोहोचविण्यासाठी याचा उपयोग कार्यकर्त्यांनी करावा ही अपेक्षा.

**सबसिडी = देशातील प्रशासित (आधारभूत) किंमत उणे खुल्या बाजारातील किंमत**

या तक्त्याच्या ७ व्या स्तंभात प्रत्येक पिकाची १९८६-८७, १९८७-८८ व १९८८-८९ या तीन वर्षांची सरासरी सबसिडीची रक्कम दिली असून ८ व्या स्तंभात सरासरी सबसिडीची सरासरी एकूण वार्षिक किंमतीशी (स्तंभ ६) टक्केवारी दिली आहे.

$$\%\ \text{सबसिडी} = \frac{\text{सबसिडी}}{\text{एकूण वार्षिक किंमत}} \times १००$$

ऊस, तंबाखू ही पिके वगळता सर्वच पिकांच्या प्रशासित किंमती बाजारातील खुल्या किंमतींपेक्षा कमी असल्याने त्या सर्वांवरील सबसिडी उणे आहे; म्हणजे त्या त्या पिकांच्या शेतकऱ्यांना सरकारने तितकी रक्कम मिळू दिली नाही. तक्त्याच्या शेवटच्या रांगेत सर्व पिकांचे मिळून आकडे दिले आहेत.

असे स्पष्टीकरण प्रारंभीच देऊन पुढे निःसंदिग्धपणे सांगितले आहे की, 'ब्राह्मणेतरातील सुशिक्षितास मी ब्राह्मण समजतो तसेच ब्राह्मणातील अशिक्षितास मी ब्राह्मणेतर समजतो.' (इथे पुन्हा अलिकडच्या काळातील एक ताज्या घटनेचे स्मरण अपरिहार्यपणे होते. शेतकरी संघटनेची चळवळ वाढू लागली तसे राज्यकर्त्या पक्षातील श्रेष्ठींकडून 'जोशी आडनावाचा माणूस शेतकऱ्यांचा नेता कसा काय होऊ शकतो?' असा फूटपाडू छद्मी प्रश्न विचारला जात होता.) १९२८ मधील पुण्याच्या (तेव्हाच्या) रे मार्केट (किंवा आताच्या फुले मंडई) मध्ये भरलेल्या 'मुंबई इलाखा शेतकरी परिषदे'त त्यांनी बार्डोलीच्या सत्याग्रहाचा गौरवास्पद उल्लेख केला आहे. मुंबई सरकारने आणलेल्या तुकडेबंदी व सारावाढ या विषयीच्या दोन बिलांना ते कडाडून विरोध करताना दिसतात. त्यांच्या मते 'सामुदायिक हिताच्या दृष्टीने लहान तुकड्यांच्या एकीकरणाप्रमाणेच मोठ्या तुकड्यांची विभागणी हितावह ठरणार....मोठ्या तुकड्यांच्या मालकाकडून जमीन घेऊन ती लहान शेतकऱ्याला द्यावी.' तसेच बॅकबे डेव्हलपमेंट, सक्कर बॅरेज अशा अत्यंत खर्चाच्या कामासाठी सारावाढ केली जात असून हे बील अन्यायाचे व जुलुमाचे आहे. म्हणून यासाठी वेळ आली तर 'सत्याग्रहाची मेढ रोवावी लागेल.' पण हा सत्याग्रह पूर्ण अनत्याचारी ठेवावा लागेल असा त्यांचा आग्रह आहे. एकंदरीनेच सरकारी धोरण 'उपाशी मरणाऱ्या पीटरला लुबाडून उधळ्या पॉलला अधिक देण्याप्रमाणेच निंद्य आहे.' असा टोमणा ते मारताना दिसतात.

*(उत्तरार्ध पुढील अंकात....)*

## लाडेगावचा पाणी लढा

अकोला जिल्ह्याच्या कारंजा तालुक्यातील लाडेगाव येथील वाघ शेतकऱ्यांनी गावच्या पाण्याच्या रक्षणासाठी दिलेल्या लढ्याचा सविस्तर वृत्तांत पुढील अंकात, लढ्याचे सेनापती श्री. गजानन अहमदाबादकर यांच्या शब्दात वाचा.

# शेतीविषयक वाटाघाटी : पूरक माहिती

## भारतातील सबसिडी (पीकवार)

| पीक | देशांतर्गत प्रशासित किंमत रुपये/टन (१) १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ | खुल्या बाजारातील किंमत रुपये/टन (२) १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ | उत्पादन दशलक्ष टन (३) १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ | किंमत दशलक्ष रुपये (४) = (१*३) १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ | एकूण किंमत दशलक्ष रुपये १९८६-८९ (५)=बेरीज(४) | वार्षिक सरासरी किंमत दशलक्ष रुपये (६)=सरासरी(४) | सबसिडी रक्कम दशलक्ष रुपये (७)=३*(१-२) | सबसिडी एकूण किंमतीच्या टक्के (८)=((७)/(६))*१०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | २१९० | २२५० | २४०० | ३५२०.०० | ३५२०.०० | ३५२०.०० | ६०.५६ | ५६.८६ | ७०.४९ | १३२६२६.४० | १२७९३५.०० | १६९१७६.०० | ४२९७३७.४० | १४३२४५.८० | -७७२३५.०० | -५३.९२ |
| गहू | १६६० | १७३० | १८३० | ३५४०.०० | ३५४०.०० | ३५४०.०० | ४६.१७ | ५४.११ | ४९.६५ | ७६६४२.२० | ९३६१०.३० | ९०८५९.५० | २६१११२.०० | ८७०३७.३३ | -८९८८०.०० | -१०३.२७ |
| मका | १३२० | १३५० | १४५० | ३९२१.०० | ३९२१.०० | ३९२१.०० | ७.५९ | ५.७२ | ८.२३ | १००१८.८० | ७७२२.०० | ११९३३.५० | २९६७४.३० | ९८९१.४३ | -१२५१७.०० | -१२६.५४ |
| तूर | ३२०० | ३२५० | ३६०० | ५२४३.०० | ५२४३.०० | ५२४३.०० | २.२७ | २.२८ | २.७२ | ७२६४.०० | ७४१०.०० | ९७९२.०० | २४४६६.०० | ८१५५.३३ | -४५५०.०० | -५५.७९ |
| हरभरा | २८०० | २९०० | ३२५० | ४१२८.०० | ४१२८.०० | ४१२८.०० | ३.६३ | ५.१३ | ४.२३ | १०१६४.०० | १४८७७.०० | १३७४७.५० | ३८७८८.५० | १२९२९.५० | -४९४५.०० | -३८.२५ |
| उडीद | ३२०० | ३२५० | ३६०० | ४३८५.०० | ४३८५.०० | ४३८५.०० | १.२४ | १.२९ | १.५९ | ३९६८.०० | ४१९२.५० | ५७२४.०० | १३८८४.५० | ४६२८.१७ | -१३९४.०० | -३०.१२ |
| मूग | ३२०० | ३२५० | ३६०० | ४७८२.०० | ४७८२.०० | ४७८२.०० | १.०८ | १.२२ | १.४२ | ३४५६.०० | ३९६५.०० | ५११२.०० | १२५३३.०० | ४१७७.६७ | -१७५२.०० | -४१.९४ |
| भुईमूग | ३७०० | ३९०० | ४३०० | ६९००.०० | ६९००.०० | ६९००.०० | ५.८८ | ५.८५ | ९.६६ | २१७५६.०० | २२८१५.०० | ४१५३८.०० | ८६१०९.०० | २८७०३.०० | -२०४१४.०० | -७१.४० |
| सोयाबीन | २९०० | ३००० | ३२०० | ३०८१.०० | ३०८१.०० | ३०८१.०० | ०.८९ | ०.९० | १.५५ | २५८१.०० | २७००.०० | ४९६०.०० | १०२४१.०० | ३४१३.६७ | -१६.०० | -०.४७ |
| कापूस | ५४०० | ५५०० | ६००० | १७३३३.०० | १७३३३.०० | १७३३३.०० | १.१७ | १.०८ | १.४९ | ६३१८.०० | ५९४०.०० | ८९४०.०० | २११९८.०० | ७०६६.०० | -१४५४३.०० | -२०५.८२ |
| राई व मोहरी | ४१५० | ४३०० | ४६०० | ६८८४.०० | ६८८४.०० | ६८८४.०० | २.६१ | ३.४६ | ४.३८ | १०८३१.५० | १४८७८.०० | २०१४८.०० | ४५८५७.५० | १५२८५.८३ | -८६१४.०० | -५६.८८ |
| ज्यूट (कच्चा) | २२५० | २४०० | २५०० | ५५९९.०० | ५५९९.०० | ५५९९.०० | १.३२ | १.०४० | १.२१ | २९७०.०० | २४९६.०० | ३०२५.०० | ८४९१.०० | २८३०.३३ | -३८३३.०० | -१३५.४३ |
| तंबाखू | १२००० | १२२०० | १२८०० | १२२४०.०० | १२२४०.०० | १२२४०.०० | ०.११ | ०.०५७ | ०.११ | १३२०.०० | ६९५.४० | १४०८.०० | ३४२३.४० | ११४१.१३ | ११.०० | ०.९६ |
| ऊस | १७० | १८५ | १९५ | १५६.१६ | १५६.१६ | १५६.१६ | ८५.२२ | ९३.९४० | ८५.६९ | १४४८७.४० | १७३७८.९० | १६७०९.५५ | ४८५७५.८५ | १६१९१.९५ | २४०५.०० | १४.८५ |
| बाजरी | १३२० | १३५० | १४५० | २७०४.०० | २७०४.०० | २७०४.०० | ४.५१ | ३.३०० | ७.७८ | ५९५३.२० | ४४५५.०० | ११२८१.०० | २१६८९.२० | ७२२९.७३ | -६८२२.०० | -९४.३६ |
| ज्वारी | १३२० | १३५० | १४७३ | २९४५.०० | २९४५.०० | २९४५.०० | ९.१९ | १२.२०० | १०.१७ | १२१३०.८० | १६४७०.०० | १४९८०.४१ | ४३५८१.२१ | १४५२७.०७ | -१६४५४.०० | -११३.२६ |
| बार्ली | १३५० | १३५० | १४५० | ४०२४.०० | ४०२४.०० | ४०२४.०० | १.५८ | १.७२० | १.४७ | २१३३.०० | २३२२.०० | २१३१.५० | ६५८६.५० | २१९५.५० | -४२०३.०० | -१९१.४४ |
| | | | | | | | | | | ३०४४०३.३० | ३२६६९५.१० | ४०३०७३.०५ | १०३४०११.४५ | ३४४६९७.१५ | -२३७४३७.०० | -६८.८८ |

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st May, 1994

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
May 21, 1994

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

शेतकरी महिला आघाडी

# कार्यकारिणी बैठक

## अकोला ८ मे १९९४

## ठराव

शेतकरी संघटना

शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकारिणीची संयुक्त बैठक ८ मे १९९४ रोजी पार पडली. या बैठकीत सर्वांगीण चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

१) बलसाड (गुजरात) येथे ३० एप्रिल व १ मे १९९४ रोजी पार पडलेल्या, किसान समन्वय समितीच्या बैठकीत घेतलेल्या आंदोलनात्मक निर्णयांना कार्यकारिणीने मान्यता देऊन पुढील कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला.

**(अ) आर्थिक सुधार कार्यक्रमांवर देखरेख**

सरकारने गेली चाळीस वर्षे शेतकऱ्यांना उणे ६९ टक्के सबसिडी दिली (म्हणजेच ६९ टक्के कर लावला) याचा अन्वयार्थ अडाण्यातल्या अडाणी 'ग्यानबा' पर्यंत, तसेच इतर बिगरशेतकरी समाजघटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशिक्षण अभियान राबविण्यात येईल.

याच संदर्भात, शेतकरी व शेतकरी कार्यकर्ते गावोगाव राजकीय पुढाऱ्यांना उणे ६९ टक्के सबसिडीच्या विषयासंबंधी जाब विचारतील.

तसेच, सरकार आर्थिक सुधार कार्यक्रम व गॅट कराराचे पालन यांबाबत प्रत्यक्ष कशी पावले उचलीत आहे यावर काटेकोरपणे देखरेख ठेवण्यात येईल.

**(ब) कर्जमुक्ती आंदोलन**

सरकार शेतकऱ्यांना २० वेगवेगळ्या शेतीमालांवर दरसाल उणे २४,००० कोटी रुपये सबसिडी देते याची वाणिज्य मंत्र्यांनी दिलेली कबुली आणि संपूर्ण देशभरातील एकूण थकित कर्जाची रक्कम सुमारे १४,००० कोटी रुपये हे आकडे पाहात शेतकरी सरकारचे काहीच देणे लागत नाही, उलट सरकारच शेतकऱ्यांचे अब्जावधींचे देणे लागते. म्हणून, १९९० साली स्थगित केलेले कर्जमुक्ती आंदोलन १ जुलै १९९४ पासून पुन्हा सुरू करण्यात येईल. कर्जवसुलीसाठी गावात येणारे अधिकारी हे लुटारूदरोडेखोरांचे हस्तक आहेत असे मानून शेतकरी त्यांच्या तोंडाला काळे फासून त्यांना गावातून हुसकावून लावतील.

**२) बँकांतील खाती बंद**

खुल्या अर्थव्यवस्थेने मिळणाऱ्या स्वातंत्र्याआड येणाऱ्या घटकांत नोकरशाही हा मोठा प्रभावी घटक आहे. पगार, महागाईभत्तावाढ, सवलती यांसाठी नोकरशाह सतत संप-बंद असे मार्ग अवलंबून सर्वसामान्य जनतेला वेठीस धरून सरकारला नमवतात. गेल्या दोनतीन महिन्यांत बँकांचे कर्मचारी, अधिकारी यांनी अनेकदा संप करून बँकांचे कामकाज बंद पाडले. शेतकरी संघटनेची कार्यकारिणी सर्व शेतकऱ्यांना आदेश देते की त्यांनी राष्ट्रीयीकृत बँकांतील आपली सर्व खाती बंद करून सर्व नोकरशाहीला समज द्यावी की यापुढे आणखी लाड पुरवून घेण्याचा त्यांनी खटाटोप करू नये; तसेच, राष्ट्रीयीकृत बँकांसमोर पिकेटींग करून इतर खातेदार नागरिकांनाही त्यांची खाती बंद करण्याची विनंती करावी.

**३) राजकीय भूमिकेवर निर्णय :**

कार्यकारिणीच्या या बैठकीत शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीने औरंगाबाद अधिवेशनापासून केलेल्या विचारविनिमयाचा व कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. तसेच, खुल्या अर्थव्यवस्थेने प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी वेगळा राजकीय पर्याय उभा करण्याच्या आवश्यकतेवर चर्चा करण्यात येऊन ठराव करण्यात आला की,

दि. २८ मे १९९४ रोजी शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीच्या पुढाकाराने मुंबई येथे, स्वातंत्र्यावर श्रद्धा असणाऱ्या, स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी कटिबद्ध होऊ इच्छिणाऱ्या देशभरातील कार्यकर्ते व विचारवंत यांच्या भरणाऱ्या परिषदेत शेतकरी संघटनेच्या वतीने भूमिका मांडण्याचे व निर्णय घेण्याचे सर्व अधिकार शरद जोशी यांना देण्यात येत आहे.

**सौ. सरोज काशीकर**
अध्यक्षा,
शेतकरी महिला आघाडी

**पाशा पटेल**
अध्यक्ष,
शेतकरी संघटना

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.-०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.